## BOMBAY ACT No. V OF 1957.

## THE BOMBAY CHARGED EXPENDITURE ACT, 1957.

मुंबई विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमति तारीख २० मार्च १९५७ रोजी मिळालेली असल्यामुळें तो यावरून सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

एन्. के. द्रविड,
मुंबई सरकारचे साचिव, विधि विभाग.

## BOMBAY ACT No. V OF 1957.

## AN ACT TO PROVIDE THAT CERTAIN EXPENDITURE SHALL BE CHARGED ON THE CONSOLIDATED FUND OF THE STATE.

## सन १९५७ चा मुंबईचा अधिनियम ५ वा.

[ राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रांत" तारीख २० माहे मार्च सन १९५७ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला. ]

## विवक्षित खर्च राज्याच्या संचित निधीवर आकारण्यांत येईल अशी तरतूद करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, विवक्षित खर्च राज्याच्या संचित निधीवर आकारण्यांत येईल असें जाहीर करणें आणि त्या कारणासाठीं विवक्षित कायद्यांतील त्यासंबंधींचे विवक्षित उपबंध रद्द करणें व नव्यानें अधिनियमित करणें इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या आठव्या वर्षी यावरून पुढें लिहिल्याप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे:—

१. या अधिनियमास मुंबईचा भारित खर्च अधिनियम, १९५७, असें म्हणावें. लघु संज्ञा.

२. (१) अनुसूचीमध्यें, आसन १ मध्यें उल्लेख केलेल्या कायद्यांचे, त्याच्या आसन २ मध्यें नमूद केलेले उपबंध तारीख १ नोव्हेंबर १९५६ पासून रद्द करण्यांत आले आहेत असें समजलें पाहिजे आणि त्या तारखेपासून उक्त अनुसूचीच्या आसन ३ मधील उपबंध त्यांच्याऐवजीं दाखल करण्यांत आले आहेत असें समजलें पाहिजे. अधिनियम रद्द करणें आणि विवक्षित खर्च राज्याच्या संचित निधीवर आकारण्यासाठीं तरतूद करणारा अधिनियम.

(२) मुंबईचा भारित खर्च अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबईचा अधिनियम ५६ वा) आणि मध्यप्रदेश संचित निधी (भारित खर्च) अधिनियम, १९५० (सन १९५० चा मध्यप्रदेश अधिनियम ४८ वा) हे यावरून रद्द केले आहेत.

## अनुसूचि.

| अधिनियम. | रद्द केलेले उपबंध. | दाखल केलेले उपबंध. |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. मुंबईचा मोटर वाहनां-वरील करांबाबत अधिनियम, १९३५ (सन १९३५ चा मुंबईचा अधिनियम ३४ वा). | कलम ९ (४) ... | " (४) पोट-कलम (२) अन्वयें दिलेला पैका आणि पोट-कलम (३) अन्वयें वेगळ्या खातीं वर्ग केलेल्या जादा रकमा राज्याच्या संचित निधीवर आकारण्यांत येतील.<br><br>स्पष्टीकरण.—'रस्ता' यांत, रस्त्याचे उतार, कडा व रस्त्याच्या बाजूचे नहर आणि रस्त्याच्या किंवा पदपथाच्या वर किंवा आडवे बांधलेले सर्व पूल, कल्व्हर्ट आणि बांधाचा रस्ता यांचा समावेश होतो." |
| २. मुंबईचा दुष्काळ मदत निधी अधिनियम, १९३६ (सन १९३६ चा मुंबईचा अधिनियम १९ वा). | कलम ७ (२) ... | " (२) अशा रीतीनें तयार केलेल्या हिशोबावरून असें दिसत असेल की, अशा वर्षाच्या शेवटी निधींतील शिल्लक ही, कलम ५ च्या परंतुकाअन्वयें राज्य सरकारनें ठरविलेल्या रकमेपेक्षा कमी असेल तर ती तूट राज्याच्या संचित निधींतून भरून काढली पाहिजे :<br><br>परंतु, ती तूट राज्य सरकार या संबंधात ठरवील अशा रकमेपेक्षा जास्त असेल तर ती वार्षिक हप्त्यांनी भरून काढली पाहिजे, शेवटचा हप्ता खेरीज करून प्रत्येक हप्त्याची रक्कम (राज्य सरकार ठरवील) अशा रकमेहून कमी असतां कामा नये." |
| वरीलप्रमाणे ... | कलम ७ (३) ... | " (३) पोट-कलम (२) अन्वयें राज्य सरकारला आलेला कोणताहि खर्च राज्याच्या संचित निधीवर आकारण्यांत येईल." |
| ३. मुंबईचा मोटर स्पिरीटच्या विक्रीवरील करांबाबत अधिनियम, १९४६ (सन १९४६ चा मुंबईचा अधिनियम ६ वा). | कलम ५-अ ... | "५-अ. कराच्या उत्पन्नाचा विनियोग.—(१) करापासून आणि या अधिनियमाअन्वयें वसूल केलेल्या दंडाखेरीज इतर दंडापासून मिळालेलें उत्पन्न राज्याच्या संचित निधीमध्यें प्रथम जमा केलें पाहिजे.<br><br>(२) उक्त उत्पन्नांतून, ह्या संबंधांत राज्य सरकार ठरवील अशी उक्त उत्पन्नाच्या ५० टक्क्यांहून अधिक नसलेली रक्कम वजा केल्यानंतर बाकी राहिलेली रक्कम, मुंबईचा मोटर वाहनां- |

| अधिनियम. | रद्द केलेले उपबंध. | दाखल केलेले उपबंध. |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | | वरील करावाबत अधिनियम, १९३५ याचें कलम ९, पोट-कलम (३) यांत निर्दिष्ठ केलेल्या राज्य रस्ता निधीमध्यें दाखल केली व वर्ग केली पाहिजे ; आणि ती रक्कम उक्त पोट-कलम (३) च्या उपबंधांस अधीन राहून, उक्त पोट-कलम (३) मध्यें नमूद केलेल्या रीतीनें व कारणासाठीं खर्च केली पाहिजे. |
| | | (३) पोट-कलम (२) अन्वयें राज्य रस्ता निधीकडे वर्ग केलेली रक्कम राज्याच्या संचित निधीवर आकारण्यांत येईल." |
| ४. मुंबईचा उंसावरील उपकरासंबंधीं अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबईचा अधिनियम ८२ वा). | कलम ११ (१) ... | "(१) या अधिनियमाअन्वयें वसूल केलेला उपकर व फी यांपासूनचें उत्पन्न प्रथमत: राज्याच्या संचित निधींत जमा केलें पाहिजे आणि त्या गोळा करणें व वसूल करणें यासाठींचा खर्च वजा केल्यानंतर, मुंबईच्या उंसावरील उपकरासंबंधीं निधी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वेगळ्या निधींत तें दर्शविलें व वर्ग केलें पाहिजे." |
| वरीलप्रमाणें ... | कलम ११ (३) ... | "(३) पोट-कलम (१) च्या उपबंधांस अनुसरून मुंबईच्या उंसावरील उपकरासंबंधीं निधीमध्यें वर्ग केलेली कोणतीहि रक्कम राज्याच्या संचित निधीवर आकारण्यांत येईल." |
| ५. मध्यप्रांत व वऱ्हाड स्थानिक मंडळांना मदतीदाखल देणग्या देण्याबाबत अधिनियम, १९३९ (सन १९३९ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम ३५ वा). | कलम ४ ... | "४. खर्च आकारणें.—कलम ३ अन्वयें राज्य सरकारनें भागवावयाच्या खर्चासाठीं आवश्यक असलेली रक्कम राज्याच्या संचित निधीवर आकारण्यांत येईल." |
| ६. मध्यप्रांत व वऱ्हाड मोटर वाहनांवर कर बसविण्याबाबत अधिनियम, १९४७ (सन १९४७चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम ६ वा). | कलम ७ (२) ... | "(२) पोट-कलम (१) अन्वयें देण्याजोगी कोणतीहि रक्कम राज्याच्या संचित निधीवर आकारण्यांत येईल." |

| अधिनियम. | रद्द केलेले उपबंध. | दाखल केलेले उपबंध. |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| ७. मध्यप्रांत व वऱ्हाड जमीनमहसूल माफी रद्द करण्याबाबत अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम ३७ वा). | कलम ५ (४) ... | "(४) ह्या कलमाअन्वयें पैका किंवा निवृत्तीवेतन देण्यासाठीं मंजूर केलेली कोणतीहि रक्कम राज्याच्या संचित निधीवर आकारण्यांत येईल." |
| ८. मध्यप्रांत व वऱ्हाड स्थानिक सरकारबाबत अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम ३८ वा). | कलम ९७-अ (३) ... [मध्यप्रदेशाचा स्थानिक सरकारबाबत (तिसरी सुधारणा) अधिनियम, १९५३ यांवरून दाखल केल्याप्रमाणें.] | "(३) राज्य सरकारनें प्रत्येक वर्षी, राज्याच्या संचित निधींतून, प्रत्येक जनपदाच्या प्रदेशांतील मालमिळकतीच्या संबंधांत साधारणपणें पोट-कलम (१) अन्वयें वसूल केलेल्या जादा शुल्का-एवढी रक्कम मदतीदाखल देणगी म्हणून प्रत्येक जनपदाला दिली पाहिजे." |
| वरीलप्रमाणें ... | कलम ९७-अ (५) ... [मध्यप्रदेशाचा स्थानिक सरकारबाबत (तिसरी सुधारणा) अधिनियम, १९५३ यांवरून दाखल केल्याप्रमाणें.] | "(५) पोट-कल (३) अन्वय राज्य सरकारनें भागवावयाच्या खर्चासाठीं आवश्यक असलेली रक्कम राज्याच्या संचित निधीवर आकारण्यांत येईल." |
| ९. सौराष्ट्रचा दुष्काळ मदत निधी अधिनियम, १९५१ (सन १९५१ चा सौराष्ट्र अधिनियम १४ वा). | कलम ७ (२) ... | "(२) अशा रीतीनें दाखविलेल्या रकमांवरून असें दिसत असेल कीं, प्रत्येक वर्षाच्या शेवटीं उक्त निधींतील शिल्लक एक कोटी रुपयांनीं कमी आहे तर ती तूट राज्याच्या संचित निधींतून भरून काढली पाहिजे :<br>परंतु, जर ती तूट पांच लक्ष रुपयांहून अधिक असेल तर ती वार्षिक हप्त्यांनीं भरून काढली पाहिजे ; शेवटचा हप्ता खेरीज करून प्रत्येक हप्त्याची रक्कम पांच लक्ष रुपयांहून कमी असतां कामा नये." |
| वरीलप्रमाणें ... | कलम ७ (३) ... | "(३) पोट-कलम (२) अन्वयें राज्य सरकारला झालेला खर्च राज्याच्या संचित निधीवर आकारण्यांत येईल." |
| १०. सौराष्ट्रचा जमीन सुधारणा अधिनियम, १९५१ (सन १९५१ चा सौराष्ट्र अधिनियम २५ वा). | कलम ४१ ... | "४१. भारित करावयाच्या रकमा.—या अधिनियमाअन्वयें नुकसानभरपाई म्हणून गिरासदारांना सरकारनें द्यावयाच्या रकमा राज्याच्या संचित निधीवर आकारण्यांत येतील." |

(True translation)

D. T. MUZUMDAR,
Examiner of Books and Publications, Bombay.